वॉरियर तायक्वांदो अकादमी
योद्धा बना, चिंता सोडा!
तज्ज्ञ ब्लॅक बेल्ट प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण
आजच जॉईन करा
शाखा : जुईनगर, सानपाडा, वाशी, कोपरखैरणे
9821143012 @warriortaekwondoacademy

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**
आपल्या सर्वांमध्ये एकसमान प्रतिभा नसते,
पण आपल्या सर्वांना
प्रतिभेचा विकास करण्याची
संधी समान मिळत असते...
– डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

वर्ष : ०५ | अंक : १८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.०२ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

पाहिजेत !! पाहिजेत !!
२० इंटरसिटी बसेससाठी
४० ड्रायव्हर्स...
२० हेल्पर्स पाहिजेत...
सचखंड बस सर्व्हिस
ट्रान्सपोर्ट– नगर, निगडी, पुणे – ४४.
: संपर्क :
पाटोळे : ९३२६८४३१७२ शितोळे : ९८८१६५७७९६

## नाशकात खळबळ! गणेशोत्सवात 'स्फोटक' कृत्य

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, नाशिक :** गणेशोत्सवाच्या पाचव्या दिवशी सर्वत्र गौराईचे आगमन थाटामाटात होत असताना नंदिनी नदीच्या काठावर जिलेटीनच्या तब्बल चार गोण्या संशयास्पदरित्या आढळल्याने रविवारी दुपारी शहरात खळबळ उडाली.



मुंबई नाका पोलिस, बॉम्ब शोधक व नाशक पथकासह गुन्हे शोध पथकाने धाव घेत तपासणी केल्यानंतर एक हजारपेक्षा जास्त जिलेटीनच्या कांड्या कालबाह्य असल्याचे स्पष्ट झाले. ऐन सणोत्सवात या विघातक कृत्याचा 'डाव' नागरिकांसह पोलिसांच्या सतर्कतेमुळे उघड झाल्याने थोडक्यात अनर्थ टळला. पोलिसांच्या माहितीनुसार, रविवारी (दि. ३१) दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास भाभा नगर परिसरातील दादासाहेब गायकवाड सभागृहाम ागील बाजूस असलेल्या नंदिनी नदीच्या काठावर संशयास्पदरित्या चार गोण्या असल्याची माहिती नियंत्रण कक्षात प्राप्त झाली. सुजाण नागरिकाने दिलेल्या 'कॉल'नुसार म ुंबई नाक्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संतोष नरूटे यांच्यासह गुन्हे शोध पथक घटनास्थळी दाखल झाले. त्या गोण्यांमध्ये जिलेटीनच्या कांड्या असल्याचे दिसताच बॉम्ब शोधक व नाशक पथकासह (बीडीडीएस) श्वान पथकाला पाचारण करण्यात आले. तपासणी पूर्ण झाल्यावर संबंधित जिलेटीन कांड्या कालबाह्य असल्याचे 'बीडीडीएस'ने स्पष्ट केले.

पोलिसांनीही तातडीने धाव घेत परिस्थिती नियंत्रित केली. मात्र, सणोत्सवात हे विघातक कृत्य करण्याचा डाव आखणारे किंवा अजाणतेपणातून हे कृत्य करणाऱ्यांचा माग आता पोलिस काढत आहे. संबंधितांना ताब्यात घेण्यासह कायदेशीर कारवाईसाठी पथके नेम ण्यात आली आहेत.

**कालबाह्य असूनही घातकच!**

जिलेटीन कालबाह्य झाले असले, तरी त्याचा धोका संभवतोच. एखाद्या कालबाह्य औषधाचा जसा विपरित परिणाम होतो, तसाच जिलेटीन कालबाह्य होऊनही त्याच्या स्फोटाची तीव्रता कमी होईलच असे नाही. किंबहुना कालबाह्य जिलेटीनचा स्फोट अधिक तीव्रतेनेही होऊ शकतो, असे पोलिस दलातील तज्ज्ञांनी सांगितले. दरम्यान, नाशिकमध्ये आढळलेल्या जिलेटीनमुळे कोणताही अनर्थ घडला नसला, तरी यामागील सूत्रधार समोर आल्यानंतरच घटनेचे कोडे उलगडणार आहे.

**जिलेटीनच्या कांड्या म्हणजे?**

जिलेटीनच्या कांड्यांचा वापर स्फोटक म्हणून केला जातो. विशेषतः खाणकाम, विहिरी खणणे, रस्ते किंवा इतर कामांदरम्यान अडथळा ठरणारे मोठमोठे दगड किंवा खडक फोडण्यासाठी जिलेटीनचा वापर केला जातो. यामध्ये मोठे छिद्र करून त्याम ध्ये जिलेटीनच्या कांड्या ठेवल्या जातात, त्यानंतर लांबून वात पेटवून स्फोट घडवून आणला जातो.

**जिलेटीन किती विध्वंसक ?**

जिलेटीनच्या कांड्या विध्वंसक असतात. एका जिलेटीनच्या कांडीच्या स्फोटामध्ये मोठमोठ्या गोष्टी उद्ध्वस्त होऊ शकतात.

हा स्फोट इतका भयंकर असतो की यामध्ये महाकाय दगडांच्या चिंधड्या उडतात । जिलेटीनच्या कांड्यांचा स्फोट होऊन अनेक दुर्घटनाही घडल्या आहेत. यात अनेक लोकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत विकृत प्रवृत्तीचे लोक जाणूनबुजून जिलेटीन कांड्यांचा वापर करून विध्वंस घडवतात.

## निवघ्याची 'शिदोरी' थेट आझाद मैदानावर!

### ६०० किमीवरून मराठ्यांना मायेचा 'निवाला'



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०१, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यांतील 'निवघा' ग्रामस्थांनी वीस हजार 'चपाती ठेच्या'ची शिदोरी थेट आझाद मैदानावर पाठवल्याने मराठा आंदोलकांना सहाशे किमीवरून मायेचा निवाला मिळाला असून मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनात पुन्हा एकदा निवघावासियांचे योगदान अधोरेखित झाले आहे.

मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे मुंबई येथील आझाद मैदानावर दि. २९ ऑगस्ट पासून उपोषण सुरू असल्याने महाराष्ट्रभरातून गाव, वस्ती, वाडीवरून लाखो मराठे आंदोलक पोहोचले आहेत. परंतु मराठ्यांची अलोट गर्दी पाहून मराठ्यांची कोंडी व्हावी आणि आंदोलन मोडीत निघावे म्हणून परिसरातील सर्व हॉटेल्स, खाणावळी बंद ठेवण्यात आली होती. त्यानंतर महाराष्ट्र भरातून मुंबईत रसद पाठवणे सुरू झाले. नांदेड जिल्ह्यातील निवघा वासियांच्या प्रत्येक घरातून २५ ते ३० चपाती तयार करून मारोती मंदिराच्या पारावर जवळपास २० हजार चपातीची रीघ लावण्यात आली.

मुंबईतील आपत्कालीन परिस्थिती पाहता निवघा येथील ग्रामस्थांनी एकत्र येऊन बैठक बोलावली. प्रत्येक घरातून २० ते ३० चपाती मुंबईकडे पाठवण्यात येणार असल्याचा संदेश गावांतील तरुणांनी प्रत्येक घरी दिला. त्याद्वारे गावच्या मारोती मंदिरात दि. २९ ऑगस्ट रोजी सायंकाळपर्यंत २० हजार चपाती एकत्रित करण्यात आली. त्यासाठी आवश्यक असलेला ठेचाही बनविण्यात आला. ही रसद रात्रीच्या 'राज्यराणी एक्सप्रेस'ने मुंबईला पाठविण्यात आली. आझाद मैदानावरील तळ ठोकून असलेले भगवान पवार, ओम पवार व इतर सहकाऱ्यांनी गावाकडून आलेली म ायेची शिदोरी आंदोलकांना वाटण्यात पुढाकार घेतला. निवघ्या सारखी रसद आता राज्यातील अनेक जिल्ह्यातून येत असल्याची माहीती भगवान पवार यांनी आझाद मैदानातून दिली आहे. त्यामुळे हक्काची भाकरी मिळाल्याचा आनंद आंदोलकांत दिसून आला.

**आझाद मैदान परिसरात चपाती ठेच्याचे वाटप!**

राज्यराणी एक्सप्रेसमधून वीस हजार चपाती ठेच्याची शिदोरी घेऊन विजय पवार, राजेश पवार, साईप्रसाद पवार, आदित्य बोचरे, संदीप पवार, योगेश पवार मुंबईत दाखल झाले. तर आझाद मैदानात भगवान पवार, प्रमोद पवार, ओम पवार, विजय पवार, आकाश पवार, अनिल पवार, जगन्नाथ पवार, मोहम्मद इसुफ, किशन पवार, संतोष पवार किरण पवार सोनू कदम यांनी मराठा आंदोलकांना चपाती ठेच्याचे वाटप केले.

## मराठा आंदोलकांनी घेराव घातला, गाडीवर बाटल्या फेकल्या, सुप्रिया सुळे यांची प्रतिक्रिया

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, बारामती :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी रविवारी (३१ ऑगस्ट) आझाद मैदानावर जात मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. मनोज जरांगे यांचं उपोषण सुरु आहे. त्यामुळे त्यांना अशक्त वाटत आहे.

सुप्रिया सुळे जरांगेंच्या भेटीला गेल्या तेव्हा जरांगे झोपले होते. त्यामुळे दोघांमध्ये फार संभाषण होऊ शकलं नाही. पण सुप्रिया सुळे यांनी मनोज जरांगे यांना तब्येतीची काळजी घेण्याचं आवाहन केलं. यानंतर सुप्रिया सुळे माघारी परतत असताना काही मराठा आंदोलकांनी त्यांना घेराव घातला. काहींनी मराठा आरक्षणावरुन प्रश्न विचारले. तर काही आंदोलकांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांचं नाव घेत टीका केली. तसेच सुप्रिया सुळे गाडीत बसल्यानंतर काही आंदोलकांनी त्यांची गाडी अडवली आणि त्या गाडीवर बाटल्या फेकल्या. या सर्व घटनेवर सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली.

सुप्रिया सुळे यांना मराठा आंदोलकांनी शरद पवारांबद्दल केलेल्या वक्तव्याबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी भूमिका मांडली. मराठा बांधव नाही स्वतः एकच माणूस असं म्हणाला. एखाद्या



आंदोलनात एखादा माणूस बोलतो. आपण समजून घेतलं पाहिजे, त्यांच्या वेदना असतात. त्यांना बोलायचा अधिकार आहे, अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली. पार्लमेंटमध्ये सर्वात जास्त मराठा आरक्षणावर बोलणारी खासदार सुप्रिया सुळे आहे, असंदेखील सुप्रिया सुळे यावेळी म्हणाल्या.

**सुप्रिया सुळे यांचा फडणवीसांवर निशाणा...**

मराठा आरक्षणाबाबत सरकार अतिशय असंवेदनशील आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जेव्हा विरोधी पक्षनेते होते त्यावेळी त्यांनी जे वक्तव्य केलं होतं, त्याची विनम्रपणे आठवण करून दिली पाहिजे. तेव्हा ते सत्तेत नव्हते. मात्र आज ते सत्तेत आहेत. गल्लीपासून दिल्लीपर्यंतची सगळी सत्ता त्यांच्याकडे आहे. अडीचशे आमदार, तीनशे खासदार, त्यांच्याकडे आहेत, असं म्हणत खासदार सुप्रिया सुळे यांनी बारामतीत पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्यावर निशाणा साधला.

मराठा समाजाला सरसकट कुणबी जात प्रमाणपत्र द्यावे, अशी मनोज जरांगे पाटील यांची मागणी आहे. या मागणीबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची भूमिकेबाबत सुप्रिया सुळे यांना विचारण्यात आलं. त्यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली. मी पहिल्या दिवसापासून सांगत आहे की, मुख्यमंत्र्यांनी आंदोलक जरांगे पाटील यांच्याशी चर्चा केली पाहिजे. जो कोणी आंदोलनाला बसला आहे त्याचा मान सन्मान एका सशक्त लोकशाहीमध्ये झाला पाहिजे. मुख्यमंत्र्यांनी सर्वपक्षीय बैठक बोलवली पाहिजे. चर्चेतून मार्ग निघू शकतो, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांच्या फेसबुक पेजवर अख च्या माध्यमातून महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांचा मराठा आरक्षण प्रलंबित ठेवल्या बाबतचा व्हिडिओ शेअर केला आहे. यावर सुप्रिया सुळे म्हणाल्या की, आमचं घर फोडलं. आमचा पक्ष फोडला. एवढं करूनही, व्हिडिओ आमचाच बनवितात. चांगलं की वाईट? याचा अर्थ आपलं नाणं चालतं ना मार्केटमध्ये अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली.

## पूरग्रस्तांच्या डोळ्यांत अश्रू, पण साईनाथ भाऊमुळे मिळाला दिलासा



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०१, कुंडलवाडी :** शहरालगत असलेल्या खेड्यांमध्ये अचानक आलेल्या पुरामुळे गावातील घरे, शेतजमि नी पाण्याखाली गेली. अनेकांचे संसार क्षणात उद्ध्वस्त झाले. भीती, हतबलता आणि उद्याचा अनिश्चित काळ त्यांच्या डोळ्यांत स्पष्ट दिसत होता. अशा कठीण काळात, साईनाथ भाऊ उत्तरवार यांनी खऱ्या अर्थाने देवदूतासारखा हात पुढे केला.

प्रशासनाने पूरग्रस्तांचे स्थलांतर केले. पण पुढे त्यांना आधार कोण देणार, हा मोठा प्रश्न त्यांच्या मनात होता. तेव्हा के. रामलू मंगल कार्यालय, कुंडलवाडी येथे साईनाथ भाऊनी स्वतः पुढाकार घेऊन दोन दिवस नाश्ता व जेवणाची व्यवस्था केली. प्रत्येकाला पोटभर अन्न मिळाले, सुरक्षित छप्पर मिळाले आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मायेचा हात मिळाला.

पूरग्रस्त नागरिकांच्या चेहऱ्यावरून ओघळणारे अश्रू कृतज्ञतेत रुपांतरित झाले. आम्हाला देवानेच तुमच्या रुपाने पाठवले, असे शब्द अनेकांनी भावनाविवश होऊन व्यक्त केले. या सेवाकार्याची दखल घेत पालकमंत्री अतुल सावे यांनी स्वतः भेट देऊन साईनाथ भाऊचे कौतुक केले. ते म्हणाले, हे कार्य देवकार्यच आहे. देव तुम्हाला अशीच ताकद आणि प्रेरणा देवो, की तुम्ही नेहम ीच जनसेवेसाठी पुढे राहा. यावेळी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, आमदार अन्य जण समुदाय उपस्थिती होता.

पूराच्या भीषणतेत हरवलेली माणुसकी साईनाथ भाऊमुळे पुन्हा जिवंत झाली. गावकऱ्यांच्या मनात कायमस्वरूपी ठसा उमटवणारे हे कार्य इतिहासात नोंदले जाईल.

## विठ्ठलवाडी पोलिसांची मोठी कामगिरी; जबरी चोरी प्रकरणातील आरोपी अटक




**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.०१, उल्हासनगर :** विठ्ठलवाडी पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा अवघ्या काही दिवसांत उघडकीस आणत आरोपीस अटक केली असून त्याच्याकडून चोरीचा मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेला चाकू जप्त करण्यात आला आहे.

फिर्यादी अजयकुमार शामल गौतम (वय २७, धंदा – शिवणकाम, रा. उल्हासनगर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता फिर्यादी व त्यांचा साथीदार रिक्षाने जात असताना आरोपीने सरकारी प्रसूती रुग्णालयाजवळ त्यांना विनाकारण शिवीगाळ करत मारहाण केली. त्यानंतर कारा मोटर्ससमोरील गल्लीत फिर्यादी व साथीदार यांना चाकूचा धाक दाखवून एकूण २१,००० रुपये लुटून ऑटो रिक्षाने उल्हासनगर रेल्वे स्टेशनकडे पळ काढला.

या प्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्र. ५८१/२०२५ नोंदविण्यात आला. तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध सुरू असताना, पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की आरोपी उल्हासनगर-४ मधील सर्टीफाय स्कूलजवळील मैदानात येणार आहे. त्यानुसार सापळा रचून पोलिसांनी इसम संजय रतन राठोड (वय २३, रा. अंबरनाथ) यास ताब्यात घेऊन अटक केली. त्याच्याकडून चोरीची संपूर्ण रक्कम व चाकू हस्तगत करण्यात आला आहे.

आरोपीस न्यायालयात हजर केले असता ३ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली असून पुढील तपास पो.उ.नि. बी.आर. दराडे हे करीत आहेत.

ही कारवाई ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सह आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, अपर आयुक्त संजय जाधव, उप आयुक्त सचिन गोरे, सहाय्यक आयुक्त अमोल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोळी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) चंद्रहार गोडसे, सपोनि हर्षल कुलकर्णी, पो.उ.नि. बंकटस्वामी दराडे व गुन्हे प्रकटीकरण पथकातील अंमलदार यांनी केली.




## तरच मैत्री शक्य...

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या चीनच्या दौऱ्यावर आहे. या दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनिपिंग यांची भेट घेतली. या भेटीत दोन्ही जागतिक नेत्यांत जवळपास पन्नास मिनिटे चर्चा झाली. या भेटीत अनेक विषयांवर चर्चा झाली. दोन्ही देशात बिघडलेले संबंध सुधारण्यावर या भेटीत भर देण्यात आला. या दौऱ्यात दोन्ही देशात करार होण्याची शक्यता आहे. २०१८ नंतर नरेंद्र मोदी यांचा हा पहिलाच चीन दौरा आहे. मोदींच्या या दौऱ्याकडे भारताचेच नाही तर जगाचे लक्ष लागले आहे कारण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क ( टॅरीफ ) लावल्यानंतर भारत आणि अमेरिकेचे संबंध कमालीचे बिघडले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी केवळ भारतावरच नाही तर चीन, मेक्सिको, कॅनडा, ब्राझील या आणि यासारख्या अन्य देशांवर देखील टॅरीफ लावले आहे. त्यामुळे भारतासह या देशातही अमेरिकेविरुद्ध प्रचंड नाराजी आहे. मात्र सर्वात जास्त चीड ही भारत आणि चीन या देशात आहे भारत आणि चीन या दोन्ही देशांवर अमेरिकेने प्रचंड टॅरीफ लावले आहेत त्यामुळे अमेरिकेच्या या दडपशाही विरुद्ध हे देश एकत्र येत आहे त्यामुळेच हा दौरा विशेष महत्वाचा ठरतो. काही दिवसांपूर्वीच भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर रशियाच्या दौऱ्यावर गेले होते तिथे दोन्ही देशांनी मिळून अमेरिकेची दडपशाही मोडून काढण्याचा निर्णय घेतला. रशिया पाठोपाठ आता चीनशी ही भारत सलगी वाढवत आये त्यामुळे अमेरिकेच्या विरोधात या तीन देशांची युती होत आहे असे मानले जात आहे. चीन आणि रशिया या जागतिक महासत्ता अमेरिकेच्या विरोधातच होत्या भारताचे अमेरिकेशी घनिष्ट संबंध होते मात्र डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकेखोर स्वभावामुळे भारतही आता अमेरिकेच्या विरुद्ध जाऊन चीन आणि रशिया यांच्या सोबत गेला तर त्याचे जागतिक राजकारणावर दुरगामी परिणाम होतील. अमेरिकेला शह देण्यासाठी हे तीन देश एकत्र आले तर अमेरिकेला निश्चितच पर्याय निर्माण होईल त्यामुळेच या दौऱ्याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. भारत आणि रशिया हे पारंपरिक मित्र राष्ट्र आहे. संकटाच्या काळी या दोन्ही देशांनी एकमेकांना मदत केली आहे याउलट भारत आणि चीन हे एकमेकांचे कधीच मित्र नव्हते. भारत आणि चीनचे शत्रुत्व जगजाहीर आहे. चीनने भारताला कायम शत्रू मानले आहे. भारताने चीनशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याचाच प्रयत्न केला चीनने मात्र भारताचा विश्वासघातच केला आहे. १९६२ साली भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी तर हिंदी चिनी भाई भाई म्हणत चीनशी मैत्रीचा हात पुढे केला होता मात्र चीनने भारताचा केसाने गळा कापत भारतावर आक्रमण करत भारताचा काही भूभाग बळकावला. त्यानंतरही चीनने अनेकदा भारताच्या खोड्या काढल्या. २०२० मध्ये गलवान खोऱ्यात चिनी आणि भारतीय सैनिकांची झालेली झपाटपट अजूनही ताजीच आहे या झटापटीत भारताचे २० जवान शहीद झाले होते. चीन भारताच्या गलवान खोऱ्यासह अरुणाचल प्रदेशावर दावा सांगतो. अरुणाचल प्रदेश हा चीनचाच भूभाग आहे असे चीन म्हणतो त्यामुळेच चीनशी भारताचे वैर आहे. भारत पाकिस्तान युद्धात चीनने कायम पाकिस्तानची बाजू घेतली आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या सिन्दुर संघर्षात चीनने पाकिस्तानची उघडपणे बाजू घेतली होती इतकेच नाही तर पाकिस्तानने या संघर्षात वापरलेले लष्करी साहित्यही चीननेच पुरवले होते म्हणूनच चीनवर भारत कसा विश्वास ठेवणार असा प्रश्न पडतो. चीन हा जगातील सर्वात अविश्वासू देश आहे. जेव्हा जेव्हा भारताने चीनशी मैत्रीचा हात पुढे केला त्या त्या वेळी चीनने भारताचा विश्वासघात केला त्याचीच पुनरावृत्ती आता होईल की काय अशी शंका उपस्थित केली जाते आणि ती रास्तही आहे पण बदललेल्या राजकीय परिस्थितीत या दोन्ही देशांना एकत्र येण्याशिवाय पर्यायही नाही. अमेरिकेला शह द्यायचा असेल तर भारत, रशिया आणि चीन यांना एकत्र यावेच लागेल. जागतिक राजकारणातले हे तीन देश एकत्र येत आहे हे स्वागतार्ह आहे. भारत, रशिया आणि चीन यांचा त्रिकोण झाला तर तर त्याचा जागतिक राजकारणावर दुरगामी परिणाम होणार हे निश्चित. मात्र त्यासाठी यातील तिसरा कोण असलेल्या चीनने जर आपला विश्वासघातकी स्वभाव सोडून दिला तरच हे शक्य आहे. अमेरिकेला शह देण्याची चीनची खरोखर इच्छा असेल तर त्यांनी मनापासून भारताशी मैत्री करायला हवी आणि आपल्यावर लागलेले विश्वासघातकी हे बिरूद काढून टाकायला हवे. मागील अनुभव पाहता हे होईल असे छातीठोकपणे कोणी सांगू शकणार नाही मात्र कोठून तरी सुरवात झाली हे देखील सुचिन्ह म्हणावे लागेल. दोन्ही देशांना मजबुरीने का होईना एकत्र यावे लागत आहे. आता एकत्र राहायचे मैत्रीचे संबंध प्रस्थापित करायचे हे चीनच्या हातात आहे ही एक सु संधी आहे. या संधीचे सोने करायचे की नेहमीप्रमाणे माती करायची हे चीनच्या हातात आहे.

# येणाऱ्या काळात मोबाईल व्यसनमुक्ती केंद्रे उभारावी लागणार

साधारणपणे व्यसन याला म्हणता येईल की,एखाद्या पदार्थाची किंवा वर्तनाची तीव्र इच्छा होणे.सर्वसाधारण भाषेत त्याला लत म्हणता येईल. एखादी गोष्ट वारंवार करण्याचे मन होणे व त्याच्या व्यक्ती अधीन होऊन जाणे.या सर्व प्रक्रिया व्यसनाच्या सदरात मोडतात.मानवी मनाला मेंदूने दिलेल्या आज्ञानुसार मनुष्य आपले कर्मेंद्रिय शारीरिक कामाला लावतात.त्यामध्ये प्रथम डोळे त्यांनतर मन एखाद्या विषयाकडे धाव घेतं व हात पाय त्या विषयाकडे वळतात. मात्र सर्वप्रथम या सवयीस कारणीभूत मन असते.मनाचा संयम उत्तम संयमपरंतु प्रथम बाह्य गोष्टीचा आघात होतो तो मनावरच...!अन एकदा का या मनावरील स्वतःचा ताबा सुटला तर ते अनेक गोष्टीच्या अधीन होऊन जाते. मग त्यातून व्यसन जडायला सुरुवात होते.व्यसनाचे अनेक प्रकार आहेत.त्यामध्ये मद्यप्राशन,धूम्रपान,सतत खरेदी करणे हे सुद्धा म्हणता येईल.हे व्यसन जडण्याचे अनेक कारणे आपणास दिसून येतात. त्यापैकी प्रथम म्हणजे नैराश्य.या नैराश्यातून व्यक्तीला आपले मन कुठेतरी गुंतून ठेवायचे असते. म्हणून त्यासाठी तो व्यक्ती व्यसन किंवा धूम्रपानाच्या आहारी जातो. दुसरे म्हणजे अपयश. या अपयशाला खचून काही व्यसनाच्या आहारी जातात.तिसरे असे की प्रेमभंग. प्रेमभंगातून मुले-मुले व्यसनाकडे वळायला लागलेले आपल्याला दिसून येते. त्याचप्रमाणे चौथे कारण म्हणजे उत्सव सण,साजरे करणे. जसे कि थर्टी फर्स्ट,मित्रांचे वाढदिवस आनंद म्हणून तरुण मंडळी सुरुवातीला धूम्रपान मध्यपान प्राशन करून बघतात व हळूहळू व्यसनाधीन होतात अशा प्रकारातून व्यक्ती व्यसनाधीन होतो.

आनंदा पोटी किंवा दुःख पोटी केलेले हे धूम्रपान व मद्यप्राशन एक दिवस व्यसनात रूपांतरित होते.व त्यातून व्यक्ति पूर्ण व्यसनाधीन झाल्यावर मात्र त्याला तेच सेवन किंवा प्राशन वारंवार करावेसे वाटते. यातूनच त्याचे शारीरिक व आर्थिक नुकसान होते. सामाजिक दृष्टिकोनातून त्याची पत खराब होते व स्वतःबरोबर कुटुंबासाठीही तो त्रासदायक ठरतो.यातून कित्येक कुटुंब,घर उध्वस्त झालेली आपण बघतो. एक विशिष्ट वयात साधारण कुमार वयातील मुले-मुलीं व्यसनाधीन होतात. तर काही वीस-पंच विशीतील व्यसनाच्या आहारी जातात. या व्यसनाधीन लोकांसाठी त्यांच्यात सुधारणा व्हावी म्हणून, समस्त जगभर समुपदेशन केंद्र उभारले आहेत.सल्लागार केंद्रे, आध्यात्मिक केंद्रे,संस्कार शिबिरे, व्यसनमुक्ती केंद्र सेवाभावी संस्था यासाठी प्रयत्न करत आहे.केंद्रात दाखल झालेली व्यक्ती समुपदेशनाद्वारे किंवा काही मनावर ताबा ठेवून, स्वतःमध्ये बदल करून स्वतःला सावरून सुधारतात व त्याची व्यसनातून सुटका होते.



उपरोक्त व्यसनमुक्ती केंद्रातून व्यसनाधीन व्यक्ती सुधारून स्वतःचा विकास करून घेऊ शकतो.मात्र हल्ली सर्व जगभर घराघरात जे प्रत्येकाला व्यसन जडले आहे ते म्हणजे मोबाईलचे व्यसन.बाकी इतर व्यसन अंगी जडायला तरी एक विशिष्ट वय असते. मात्र हे मोबाईलचं व्यसन अगदी विचित्र आहे कि,ज्याला वय,काळ नाही. अगदी लहान वयातील मुलं म्हणजे एक वर्षाच ते दीड वर्षाचे मूल मोबाईलच्या आहारी गेलेलं आपल्याला दिसून येतं.व्हिडिओ बघितल्याशिवाय ते जेवण सुद्धा करत नाही.इतर व्यसनाला व्यक्ती स्वतः कारणीभूत असतो मात्र दीड ते दोन वर्षाच्या मुलांना मोबाईलचे व्यसन लावायला त्यांचीच आई-बाबा कारणीभूत असतात. म्हणजे या व्यसनाला वय नाही व लहान मुलांना मोबाईलच्या व्यसनाधीन बनवायला आई-बाबा जबाबदार आहेत.मुले जसे-जसे मोठे होऊ लागतात तसतसे त्यातील गेम, रिल्स बघायला लागल्यानंतर तर ते पूर्ण मोबाईल चे अधीनझालेले दिसून येतात. बाहेर खेळायला सुद्धा जात नाही मैदानी खेळ खेळत नाही. घरात बसून लठ्ठपणा व मनोरुग्न होताना दिसून येत आहे. त्यामुळे मुलं हट्टी होत आहे. एवढेच काय ! बारा ते चौदा वर्षाची मुलं मोबाईल हाताळायाला दिला नाही म्हणून, आत्महत्या करताना दिसून येत आहे. एवढी भयावह परिस्थिती हल्ली या मोबाईलच्या व्यसनामुळे झालेली आपल्याला दिसून येत आहे.

वयाच्या सोळा ते पंचवीस वयोगटातील तरुण-तरुणी सुद्धा मोबाईलच्या खूपच अधीन झालेल्या दिसून येत आहे.वेगवेगळ्या ॲँप्सच्या माध्यमातून रील बनवत आहे.अश्लील स्वरूपाच्या रिल्स बनवून समाजामध्ये अश्लीलता पसरवण्याचे काम करत आहे. एका विशिष्ट वयातील मुले आकर्षणापोटी, उत्सुकतेपोटी तासंतास ते बघत बसतात. अभ्यासाकडे दुर्लक्ष करतात. मैदानी खेळ खेळताना दिसत नाही. चार भिंतीच्या आतील व्हिडिओ गम खेळत आहेत.



त्याचबरोबर व्हाट्सअप सारख्या ऍप्सवर हल्ली स्टेटस ठेवण्याचा कल(ट्रेंड)भरपूर प्रमाणात वाढला आहे.बाहेर कुठेतरी फिरायला गेले असता,स्वतःचे छायाचित्र कॅमेरात कैद करून स्टेटस ठेवतात.या सेल्फी काढण्याच्या नादात कितीतरी तरुण-तरुणींना जीव गमावा लागला आहे. काहींना व्यसन जडल जडलेले आपल्याला दिसून येत आहे.कुटुंबातील किंवा स्वतःचा वाढदिवस असल्यास त्याला ज्यांनी स्टेटसच्या माध्यमातून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या त्या स्टेटसचा स्क्रीनशॉट काढून स्वतःच्या स्टेटस ठेवण्याचा हल्ली ट्रेंड आहे.नेमकं यातून त्याला काय सिद्ध करायचे आहे कुणास ठाऊक?असो! या स्वरूपाचे असे मोबाईल मध्ये असे अनेक ॲप्स आहेत. त्यामध्ये फेसबुक,स्नॅपचॅट,इंस्टाग्राम,व्हिडिओ एडिटर यावर तरुण-तरुणी कितीतरी तास आयुष्यातील वेळ खर्च घालतात. अर्थात एखाद्या मद्यपीप्रमाणे त्या मोबाईल मध्ये तासान तास गुंतून गेलेले दिसून येतात. म्हणजेच त्यांना तीच क्रिया किंवा मोबाईल मधील तेच दृश्य,व्हिडिओ,छायाचित्र वारंवार बघावेसे वाटतात. म्हणजेच ते पूर्णतः मोबाईलचे अधीन झालेले आपल्याला दिसून येतात. तज्ञांच्या मतानुसार मोबाईलच्या आहारी गेलेल्या अगदी चिमुकल्या पासून ची संख्या झपाट्याने वाढत आहे. सर्वेनुसार शंभरपैकी चाळीस ते पंचेचाळीस टक्के मुले पूर्णतःमोबाईलच्या आधीन झालेले आपल्याला दिसून येत आहे.तर तरुण-तरुणींचे मोबाईल मुळे मनोरुग्णांतील प्रमाण दुपटीने वाढले आहे.मोबाईलच्या सततच्या वापरामुळे डोळ्यांचा त्रास,मोबाईल झूकून बघितल्या मुळे मानेचा त्रास तर सततच्या एका जागी बसल्यामुळे कमरेचा त्रास होताना दिसून येत आहे. त्याचबरोबर कुटुंबातील नात्यांमध्ये गैरसमजातून मनभेद आणि मतभेद होताना दिसून येत आहे.

सध्याच्या काळात या पिढीला जडलेले हे मोबाईलचे व्यसन इतर व्यसनांपेक्षाही महाभयंकर ठरणारे आहे.इतर व्यसन तरी त्यांच्या नशेची तीव्रता कायम राहेपर्यंत राहील व काही काळाने उतरून जाईल.मात्र मोबाईलचे व्यसन याहून भिन्न आहे कारण त्यातील गेम्स,अश्लील व्हिडिओ,चित्र-विचित्र रील्स ह्या मुलांना व तरुणांनाच काय वृद्धांनासुद्धा आकर्षित करत आहे. दुसरी गोष्ट अशी कि,मोबाईल अर्थात भ्रमनध्वनी हा सोबत घेऊन कुठेही भ्रमन करू शकतो.त्यामुळे तो सतत व्यक्तींसोबत असतो. त्यातील इंटरनेटची सुविधा सर्वत्र उपलब्ध असल्यामुळे व्यक्ती रात्री-अपरात्री बघत बसतो.पूर्वी जे व्यावसायिक कॅमेऱ्यात मेगा फिक्सल यायचे ते हल्ली मोबाईलच्या कॅमेरा मध्ये दिसून येत आहे.तरुण तरुणीच काय वृद्धसुद्धा हल्ली कॅमेरातील फिल्टर्स मोडमुळे काळ्यासावळ्या चेहऱ्यावरील डागही त्यातील फिल्टर्स,क्रॉप,एडिटिंगचा वापर करून क्षणात मिटवून स्वतःला सुंदर दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहे.त्यांचे मोबाईलच्या स्टेटसवरील सुंदर,आकर्षक एडिटेड फोटो बघितल्यावर प्रसन्न झालेल्या मनाचा त्यांना प्रत्यक्षात बघितल्यावर मात्र पूर्णतःभ्रमनिराश होतो.या अर्थहीन फालतू गोष्टींच्या नादात तरुण-तरुणी तासनतास घालवत आहे.जरी आपले कर्म सुंदर नसले तरी,जगासमोर सुंदर दाखवण्यासाठी प्रयत्न करीत आहे. असल्या या अर्थहीन गोष्टीमध्येच ही तरुण पिढी या मोबाईलच्या व्यसनाने आयुष्याची वाट लावून घेत आहे.

या काळात सर्व जगाला या मोबाईलने भुरळ घातली आहे. त्याच्यापायी कित्येकांना आपले जीवन गमवावे लागले आहे.कित्येकजण एकलकोंडे होऊन मनोरुग्ण होतांना दिसून येत आहे. ज्याप्रमाणे दारू, सिगारेट,बिडी या व्यसनाने ग्रासलेल्यांना त्याच्यातून सुटका करून घेण्यासाठी किंवा जाचातून बाहेर काढण्यासाठी जसे व्यसनमुक्ती केंद्र, सल्लागार केंद्र,समुपदेशन केंद्र उभारले आहेत. त्याचप्रमाणे येणाऱ्या काळातमोबाईल व्यसनमुक्ती केंद्रउभारावे लागणार आहे असे वाटते.



**- विनोद जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

# श्री गणेशाला मॉडेल बनवू नका !

नामंकित कंपन्या आपली उत्पादने खपवण्यासाठी साधारणतः प्रसिद्ध चित्रपट अभिनेता-अभिनेत्री किंवा खेळाडू यांना घेऊन आपल्या उत्पादनांची जाहिरात बनवतात आणि तिचे टीव्ही, वृत्तपत्रे किंवा अन्य प्रसारमाध्यमांतून प्रसारण करतात, त्यासाठी त्यांना लक्षावधी रुपये खर्चही करावे करतात. गणेशोत्सव काळात मात्र काहीजण थेट श्री गणेशालाच मॉडेल बनवून आपल्या उत्पादनांची जाहिरात करत असल्याचे गेल्या काही वर्षांमध्ये लक्षात आले आहे. गणेशोत्सवादरम्यान टीव्ही, वृत्तपत्रे, रस्त्यांवरील होर्डिंग्स यांवर झळकणाऱ्या उत्पादनांच्या आणि आस्थापनांच्या जाहिरातींमध्ये श्री गणेशाच्या चित्रांचा



सर्रासपणे वापर केला जातो. या दिवसांमध्ये वातावरण गणेशमय असल्याने तसे होणे स्वाभाविक आहे. मात्र काही आस्थापने आपली उत्पादने खपवण्यासाठी श्री गणेशाच्या चित्रांचा आणि ॲनिमेटेड चलचित्रांचा एखाद्या मॉडेलप्रमाणे वापर करताना दिसतात. श्री गणेशाच्या हातामध्ये सदर उत्पादने देऊन किंवा श्री गणेश त्या उत्पादनाच्या चित्राकडे बोट दर्शवून ते घेण्यास प्रवृत्त करत असल्याचे दाखवले जाते. काही जाहिरातींमध्ये तर श्री गणेशाच्या तोंडी ते उत्पादन घेण्याविषयीचे संवाद टाकले जातात. श्री गणेश हे समस्त भक्तांचे श्रद्धास्थान आहे, कोणा आस्थापनांचे उत्पादन खपवणारे मॉडेल नव्हे, आपल्या लाभासाठी श्री गणेशाचा अशा प्रकारे वापर करणे ही एकप्रकारे गणरायाची अवहेलनाच आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या जाहिराती कुठे आढळल्यास गणेश भक्तांनी या आस्थापनांना जाब विचारायला हवा.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

# गणेशोत्सव व ईदच्या पार्श्वभूमीवर मंद्रूप पोलिसांनी काढला रूटमार्च

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, सोलापूर :** आगामी अनंत चतुर्दतीला मिरवणूक व ईद ए मिलादच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी पोलिसांनी मंद्रुप गावातून पथसंचलन करीत रूटमार्च काढला. मंद्रूप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांच्या नेतृत्वाखाली हा रुटमार्च काढण्यात आला.

पोलीस ठाणे ते बस स्थानक व तेथून गावातील मुख्य रस्त्यावरून हा मार्च बाजारपेठेत आला. यावेळी बसस्थानक परिसरात दंगल काबूत ठेवण्याची रंगीत तालीम घेण्यात आली. सदर या रूट मार्चमध्ये सपोनि मनोज पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस व होम गार्ड सहभागी झाले होते. यावेळी मंद्रूप पोलिसांकडून



गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये व पैगंबर जयंतीच्या मिरवणुकीत डीजे लावू नये. जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस प्रमुख यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करावे. जो कोणी या आदेशाचे उल्लंघन करेल त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा ध्वनीक्षेपकावरून देण्यात आला. या रूटमार्चमध्ये पोलिस उपनिरीक्षक राजकुमार डांगे, यांच्यासह सर्व पोलिस कर्मचारी होम गार्ड सहभागी झाले होते.

## गौरी माता..

विघ्नहर्त्याचे सोबत
उत्साहे गौरी स्वागत
जेष्ठाकनिष्ठा आल्या
अहा वाजत गाजत

घर परिसर सफाई
शरिर होई शुचिर्भूत
मने निर्मळ विशुद्ध
कळे सगुणअंगीभूत

गणपतीसहीत गौरी
पुजनात दिसे सुकृत
महत्व जाणे नारीचे
सणाचेस्वरुपअद्भुत

गणेश बुध्दीचा देव
गौरी शक्तीचे दैवत
महालक्ष्मी अधिष्ठीत
शोभुन दिसे ऐरावत

शृढ रूढि परंपरागत
नव युगात ये दुभंगत
जुनेसण नवामुलामा
आद्य पिढी रे पारंगत

नर नारी सम समान
सण आले हे सांगत
भेदाभेद सर्वं गळता
येणारं चांगली रंगत

**हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज अचूक वेध, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
**हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.**
**या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत.** Email : newsaksharaj2021@gmail.com **संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२**

# बल्लारपूरचे विद्यार्थी देशात प्रत्येक क्षेत्रात अव्वल ठरावे - आ.मुनगंटीवार




## ग्लोबल वन बहुद्देशीय संस्थेतर्फे चित्रकला स्पर्धा, मार्गदर्शन व सत्कार समारंभ

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने ग्लोबल वन बहुउद्देशीय संस्थेतर्फे बल्लारपूर येथे भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेतून विद्यार्थ्यांच्या सृजनशीलता नवी दिशा मिळाली असून, कलेतून भविष्याची स्वप्ने रंगविण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली आहे. विद्यार्थ्यांनी मनात ठाम ध्येय ठेवून संपूर्ण शक्तीनिशी झोकून द्यावे, कारण मेहनत व परिश्रम हाच खऱ्या यशाचा मंत्र आहे. बल्लारपूरचे विद्यार्थी देशात प्रत्येक क्षेत्रात अव्वल ठरावेत, अशी अपेक्षा राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

बल्लारपूर येथील नाट्यगृहात ग्लोबल वन बहुउद्देशीय संस्थेतर्फे आयोजित चित्रकला स्पर्धा, मार्गदर्शन व सत्कार समारंभ प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला वन विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष चंदनसिंह चंदेल, भाजपा जिल्हाध्यक्ष हरिश शर्मा, शहराध्यक्ष ॲड. रणंजय सिंग, काशीनाथ सिंग, ग्लोबल वन बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष अंकुश अवधे, सचिव सुरज नागतुरे, दारी, शिवचंद्र द्विवेदी, जगदीश लवाडिया, रेणुकाताई दूधे विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती.

आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, विद्यार्थ्यांनो, स्पर्धेसाठी सज्ज व्हा. आपल्या कलागुणांचा विकास करा. मनात जे ध्येय आणि उद्दिष्ट निश्चित कराल ते साध्य करण्यासाठी संपूर्ण मनोभावे स्वतःला झोकून द्या. मेहनत व परिश्रम हाच यशाचा खरा मंत्र आहे. खूप शिका, परिवाराची सेवा करा आणि परिवाराचे देशभर नावलौकिक करा. जे कराल ते पूर्ण शक्ती व ऊर्जेने करा, उज्ज्वल भविष्य घडवा. असे मार्गदर्शन त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले.

सर्वांच्या सहकार्य आणि शुभेच्छांमुळे मला ऊर्जेने कार्य करता आले असून, आगामी काळात अनेक नवे उपक्रम हाती घेण्याचा संकल्प आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची सेवा आणि महाराष्ट्राचे राज्यगीत प्रत्येक शाळेत गुंजत राहावे, हीच माझी खरी प्रेरणा असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या ऊर्जेतून व शक्तीतूनच मला कार्य करण्याची प्रेरणा मिळते.

### गुणवंतांचा सत्कार

दहावीच्या परीक्षेत उत्कृष्ट टक्केवारीने उत्तीर्ण झाल्याबद्दल सोनल मून, अवंती धोंगडे, सचिन यादव व विधी देवगडे या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आला.

### वनजमीन पट्टे वाटप

वनमाला अशोक मेश्राम, अजमेर खान इदायत खान पठाण, चंदा कुमार ठमके, जुलेखा बेगम अहमद हुसेन, रेखा कैलाश वतारे, ताराबाई गुरुकुंतावार, छायाताई तेलंग आणि अजय भगत आदिनाथ यांना वनजमिनीचे पट्टे आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

# सण उत्सव शांततेत साजरे करा - पोलीस निरीक्षक भगत
# हिमायतनगर पोलीस ठाण्यात गणेश मंडळाची बैठक संपन्न

**अक्षराज : रमेश पंडित**

**दि.०१, हिमायतनगर (नांदेड) :** तालुक्यात गणेश उत्सव हा सण मोठ्या आनंदात व हर्ष उल्हासात साजरा केला जातो. यावर्षी वरून राजाने सर्वत्र अतिवृष्टी सदृश्य पाऊस झाल्यामुळे गणेश उत्सवाच्या सुरुवातीपासूनच पावसाचे आगमन झाले आहे. त्यामुळे शहरासह तालुक्यात अनेक ठिकाणी दररोज पडत असलेल्या पावसामुळे गणेश उत्सवातील कार्यक्रमावर संकट आले आहे. पण आगामी काळात गणेश मिरवणुकीत कुठेही डीजे साऊंड सिस्टिम लावून धार्मिक तेढ निर्माण करण्याचा कोणत्याही मंडळांनी प्रयत्न करू नये. या संदर्भात सोमवार, दिनांक ०१ सप्टेंबर २०२५ रोजी हिमायतनगर पोलीस ठाण्यात सर्व गणेश मंडळाची बैठक घेण्यात आली. यावेळी उपस्थित गणेश मंडळांना मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक अमोल भगत यांनी असे आवाहन केले की, सर्व सण, उत्सव शांततेत व कायद्याच्या चौकटीत राहून साजरे करा. कुठेही गालबोट लागता कामा नये, असे सांगितले.

यावेळी हिमायतनगर पोलीस स्थानकात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बसवण्यात आलेल्या श्री गणेशाचे सर्व गणेश मंडळाच्या उपस्थित पोलीस निरीक्षक अमोल भगत यांनी मनोभावे आरती करून सर्व गणेश भक्तांना महाप्रसाद दिला. त्यानंतर हिमायतनगर तालुक्यात एक गाव, एक गणपती अशी २० गावच्या ग्रामस्थांनी संकल्पना राबविली. त्या गावात एकच गणपती बसून त्याची मनोभावे पूजा, अर्चना करत ढोल ताशाच्या गजरात मिरवणूका काढण्याचा संकल्प केला. असाच संकल्प आगामी काळात सर्वांनी करावा. असे सांगून हिमायतनगर पोलीस स्थानकाच्या हद्दीत ७० गावे आहेत. या ७० गावांमध्ये १०५ गणपती बसवण्यात आले तर ग्रामीण भागामध्ये परवानाधारक ६३ व विनापरवाना २२ व शहरांमध्ये परवानाधारक १४ व विनापरवानाधारक ६ असे एकूण २० गणपती बसवण्यात आले आहे. त्यामुळे शहरातील सर्व गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आगामी



गणेश मिरवणुकीच्या वेळेस कुठेही कायदा सुव्यवस्था भंग होणार नाही. याची काळजी घेऊन आपला सण शांततेत व मोठ्या हर्ष उल्हासात धार्मिक वाद्य लावून डीजे व साऊंड सिस्टिम व लेझर लाईटचा वापर न करता सण साजरा करा, असे आव्हान हिमायतनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अमोल भगत यांनी गणेश मंडळाच्या बैठकीदरम्यान केले. यावेळी शहरातील सर्व गणेश मंडळाचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोनपावलांनी गौरी - गणपती आल्या घरी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०१, विंचूर (नाशिक) :** गौरी गणपती हे व्रत तीन दिवसाचे भाद्रपद महिन्यात हिंदू धर्मानुसार स्त्रिया मोठ्या भक्तिभावाने साजरा करतात. विंचूर येथील क्षिरसागर कुटुंबातील जेष्ठा गौरी- गणपती (महालक्ष्मी) चे व्रत तीन दिवसाचे भाद्रपद महिन्यात शुक्ल पक्षात अनुराधा नक्षत्रावर हे व्रत एक सण म्हणून साजरा केला जातो.

महाराष्ट्रात गौरी पूजन विधी वेगवेगळ्या रूढी परंपरेनुसार त्या-त्या पद्धतीने करण्यात येतात असे दिसून येते.आगमनाच्या दिवशी या गौरीच्या मुखवट्याची पूजन करून घंटानाद करत पाच सुवासिनींनी औक्षण करून लक्ष्मीला घरात आणले जाते. नंतर पंचांग मुहूर्ता नुसार संध्याकाळपर्यंत त्यांना सजून साडी - चोळी, दाग-दागिने घातले जाते. ह्या पहिल्या आगमनाच्या दिवशी



भाजी-भाकरीचा नैवेद्य दाखवला जातो.

दुसऱ्या दिवसी म्हणजे गौरी पूजनाचा असतो. सकाळी गौरीचे पूजन करून घरात फराळाचे पदार्थ करंज्या, पुर्या, लाडू अशा प्रकारे इतर पदार्थ करून या गौरी पुढे ठेवून त्याचा नेवेद्य दाखवला जातो. तसेच पुरणपोळी, सोळा भाज्या, पानाचा विडा अशाप्रकारे विविध प्रकारचा नैवेद्य दाखवून व दोन सुवासिनी यांनाही जेऊ घालतात. त्यांना देवी रूप मानून त्यांचा आदर करून त्यांची ही पूजा केली जाते. नंतर आरत्या केल्या जातात व संध्याकाळी हळदी- कुंकूचा गौरी दर्शनाचा कार्यक्रम ठेवला जातो.सासरी गेलेल्या मुलींना या कार्यक्रमानिमित्त माहेरी आणतात व रात्री अगदी आनंदमयी वातावरणात भजने, गौरी चे गाणे म्हणत जागरण केले जाते.

तिसरा दिवस म्हणजे गौरी विसर्जनाचा म्हणजे दुःखाचा व उदासिनतेचा दिवस या दिवशी दही-भाताचा नैवेद्य दाखवून आरत्या करून परत पाच सुवासिनी यांच्या हातून गौरी उठवतात. या आलेल्या स्त्रियांना फुटाणे वाटले जातात, नंतर नदीवर विसर्जन केले जाते.

# उमराठ येथील लहान मुलांच्या फॅन्सी ड्रेस स्पर्धा ठरली लक्षवेधी

**अक्षराज : उदय दणदणे**



**दि.०१, उमराठ (गुहागर) :** कोकणात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून गणेशोत्सवा निमित्त अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. गौरी आगमनाचे औचित्य साधत गुहागर तालुक्यातील उमराठ खुर्द आंबेकरवाडीतील रॉयल प्रतिष्ठान तर्फे स्तुत्य असा उपक्रम हाती घेत स्थानिक कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी रविवार दिनांक ३१ऑगस्ट २०२५ रोजी लहान मुलांसाठी वयोगट (२ ते १० वर्ष)फॅन्सी ड्रेस स्पर्धा- २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत मुली-०८ आणि मुले-१० असे एकूण १८ मुलामुलींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत आपली कला सादर केली व उपस्थितांची मने जिंकली. सहभागी तसेच विजेत्या मुलामुलींना बक्षीस म्हणून शालेयउपयोगी वस्तू भेट देण्यात आल्या.स्पर्धेला उपस्थितीत आंबेकरवाडीतील पोलिस पाटील वासंतीताई आंबेकर तसेच गंगाराम आंबेकर,मनोहर आंबेकर,नितीन आंबेकर,योगेश आंबेकर, शैलेश आंबेकर,प्रकाश आंबेकर,हेमंत आंबेकर,स्वीकार आंबेकर, राजेश आंबेकर, शिशिर आंबेकर,जयेश आंबेकर सतीश आंबेकर, प्रवीना आंबेकर, प्रणाली आंबेकर,अश्विनी आंबेकर यांच्या हस्ते सदर बक्षीस वितरण करण्यात आले. सदर कार्यक्रमाला ज्येष्ठ नागरिक तसेच तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रॉयल प्रतिष्ठान-उमराठ आंबेकर वाडीचे पदाधिकारी सदस्य यांनी अथक परिश्रम घेतले. प्रतिवर्षी नवनवीन उपक्रम राबविणार असल्याचे रॉयल प्रतिष्ठानचे प्रतिनिधी संदीप आंबेकर यांनी सांगितले.

# भारताचे आंतरराष्ट्रीय खेळात प्रतिनिधित्व करणार महाबळेश्वर नगरपालिकेच्या गिरीस्थान प्रशालेची कु.पवार

**अक्षराज : रियाज मुजावर**



**दि.०१, सातारा :** इंडियन ओपन पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत गोळा फेक व थाळी फेक मध्ये कृष्णा पवार हिने सुवर्णपदक पटकावले आहे. गिरीस्थान प्रशालेची ही कन्या १५ वर्षीय पॅरा ॲथलेटिक्स मधील एफ इलेव्हन ही दृष्टीदोष असलेल्या खेळाडूंच्या श्रेणीमध्ये गोळा फेक व थाळीफेक या दोन्ही प्रकारांमध्ये सुवर्णपदक मिळवून प्रथम आली. इंडियन ओपन पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५ खेलो इंडिया स्पर्धा श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी पुणे येथे नुकतीच १६ ते १८ ऑगस्ट २०२५ या कालावधीत झाली.

या स्पर्धेत तिने हा मान मिळवला. यावेळी स्पर्धेचे प्रमुख अतिथी भारताचे पहिले पॅरालिंपिक सुवर्ण पदक विजेते मुरलीकांत पेटकर व सचिन खिलारी यांच्या हस्ते तिला सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. कृष्णाने मिळवलेल्या यशा बद्दल मुख्याधिकारी योगेश पाटील यांच्या हस्ते तीचा सन्मान करण्यात आला. तिला यासाठी तिची आई मीनाक्षी व वडील टॅक्सी चालक प्रमोद पवार यांनी तसेच प्रशिक्षक डॉक्टर अक्रम मुजावर, महाबळेश्वर एफ.एफ.सी चे प्रमुख शोयब शेख यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे प्राचार्य परमेश्वर माने यांनी तिचे अभिनंदन केले.

# थोडक्यात

## एका मेसेजवर एक टेम्पो अन्नधान्य मुंबईकडे रवाना
### रविंद्रशेठ राजदेव मित्र मंडळाचा पुढाकार




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१,पारनेर (अहिल्यानगर) :** मराठा आरक्षणासाठी मुंबईच्या आझाद मैदानावर मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला मदतीचा हात पारनेर तालुक्यातूनही पुढे आला आहे. नांदूर पठार व कारेगाव परिसरातील ग्रामस्थांनी एकत्र येत सोमवारी एक टेम्पोभर अन्नधान्य सामग्री मुंबईकडे रवाना केली. सरकारकडून आंदोलनकर्त्यांच्या राहण्याची व खाण्या - पिण्याची व्यवस्था न झाल्याने अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यातच हॉटेल व टपऱ्यांवर निर्बंध आल्याने आंदोलनकर्त्यांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. हा संदेश सोशल मीडियावर व्हायरल होताच मदतीचा ओघ सुरू झाला असून. ग्रामीण भागातून शिधा व जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक मुंबईकडे सुरू झाली आहे.

या पार्श्वभूमीवर निलेश लंके प्रतिष्ठानच्या आवाहनाला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत मराठा आरक्षणासाठी भक्कम पाठिंबा दिला. नांदूर पठार, कारेगाव येथिल ग्रामस्थांनी ३०००हजार भाकरी, ७० किलो शेंगदाणा चटणी, बिस्किटे पाण्याच्या बाटल्या, चिवडा आदि खाद्यसामग्री गोळा करून ती एका टेम्पो भरून स्वतः रविंद्र राजदेव आणि त्यांच्या मित्रमंडळाने पीकअप गाडीतून ही सामग्री मुंबईला रवाना केली. यावेळी दत्तात्रय देशमाने, जनार्दन चौधरी, जयवंत आग्रे, हरिभाऊ आग्रे, भानुदास आग्रे, सुरेश आग्रे, रवी घोलप, मदन देशमाने, नामदेव आग्रे, नवनाथ पाटील घोलप, शंकर मामा आग्रे, आवड्या घोलप, सुनील राजदेव, रामदास राजदेव, सागर राजदेव, कैलास राजदेव, रमेश घोलप, बबन पाटील घोलप, अमोल गाडगे, सोन्या पानसरे, तसेच विकास विद्यालयातील विद्याथ आणि शिक्षक उपस्थित होते.

## टाकळी ढोकेश्वर येथे भैरवनाथ मंडळाकडून गणेशाची स्थापना

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील भैरवनाथ मित्र मंडळाच्या युवक कार्यकर्त्यांनी गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी भैरवनाथ मंदिर परिसरात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने शाडूच्या मातीच्या श्री गणेश मुर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली आहे. टाकळी ढोकेश्वर गावास पौराणिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी असून रामायण काळापासून अध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रात सदैव अग्रेसर आहे.

बांडे मळा वस्ती वरील भैरवनाथ मित्र मंडळाच्या सर्व युवा कार्यकर्त्यांनी श्री गणेशाची स्थापना करून आकार दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यातून मनोरंजनाबरोबरच सामुहिक संघटनात्मकतेच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरणीय पातळीवर जनजागृती करण्याबरोबरच परिसराचा कसा विकास साधायचा याचे धडे देणे हे भैरवनाथ मित्र मंडळाच्या सदस्यांचे प्रमुख उद्दिष्ट आहे. गणपती उत्सवात काळात शिस्तीला विशेष महत्त्व दिले जाते. दररोज सायंकाळी महाप्रसादाचे वाटप करण्यात येते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते गंगाधर बांडे, कृष्णा (केबी) बांडे, प्रविण बांडे, आप्पा झावरे, सोमनाथ बांडे, लक्ष्मण बांडे, गणेश बांडे मेजर, संगम बांडे, बबनराव बांडे, महेश बांडे, बंटी बांडे, नितीन बांडे, आदी उपस्थित होते. तसेच गणेश उत्सवानिमित्त भैरवनाथ मित्र मंडळाच्या वतीने विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## पोलीस उपायुक्त झेंडे यांच्या नेतृत्वाखाली भव्य रूटमार्च

**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**



**दि.०१, कल्याण (ठाणे) :** आगामी गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद या दोन महत्त्वाच्या सणांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी परिमंडळ ३ कल्याणच्या हद्दीत सोमवार, दिनांक ०१ सप्टेंबर २०२५ रोजी संध्याकाळी भव्य रूटमार्च काढण्यात आला. सदर रूटमार्च महात्मा फुले चौक पोलीस ठाणे हद्दीतील काळी मशिद चौक येथून सुरू झाला. त्यानंतर सहजानंद चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, शंकरराव चौक, अत्रे रंगमंदिर, गांधी चौक, जुने बाजारपेठ पोलीस ठाणे, कोकण मर्कंटाईल बँक, दुधनाका, विजय लॉन्ड्री, पारनाका, टिळक चौक, अहिल्याबाई चौक, मोहिंदर काबुलसिंग चौक, लाल चौकी, दुर्गा माता चौक मार्गे जात गणेशघाट विसर्जन स्थळावर रूटमार्चची सांगता झाली. या रूटमार्चमध्ये स्वतः अतुल झेंडे, पोलीस उपायुक्त (परिमंडळ ३, कल्याण) तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त, कल्याण विभाग उपस्थित राहिले होते. यावेळी वपोनि-४, पीएसआय-२१, पोलीस अंमलदार-११०, एसआरपी-१ प्लॅटून (२ सेक्शन), पीटर मोबाईल-४, सीआरएम मोबाईल-४, पीसीआर मोबाईल-४ आणि स्ट्राइकिंग मोबाईल-१ अशा मोठ्या फौजफाट्यासह पोलिसांनी सहभाग घेतला. गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद शांततेत, सुसंवादाने व सुरक्षिततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी ही विशेष मोहीम हाती घेतली असल्याचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी सांगितले.

## पालशेत समुद्र किनारपट्टी स्वच्छता मोहीम यशस्वी

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०१, पालशेत (गुहागर) :** गुहागर तालुक्यातील पालशेत येथील तरुणांच्या सांघिक कृतीतून स्थापन झालेली सहयोग फाऊंडेशन पालशेत संस्थेच्या माध्यमातून गाव स्वच्छतेवर भर देत गावातील महत्त्वाचे परीसर प्रतिवर्षी गणेशोत्सव दरम्यान स्वच्छता मोहीम राबवून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत आहेत. सहयोग फाउंडेशनचे शिलेदार समाजहित जोपासत विविध उपक्रम हाती घेत असून गणेशोत्सव २०२५ निमित्त संस्थेच्या वतीने स्वच्छता मोहीम राबवत पर्यटकांचे आकर्षण ठरलेलं पालशेत समुद्र किनारपट्टीची साफसफाई करण्यात आली, संस्थेच्या सदर उपक्रमात पालशेत येथील अनेक तरुण तसेच सहयोग फाऊंडेशनचे अध्यक्ष संजय झिंबर,सदस्य,पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर उपक्रमाला समाजसेवक पकंज बिर्जे आणि नरेंद्र नार्वेकर यांच्या वतीने सदर मोहिमेत सहभागी झालेल्या सर्वांना पाण्याची आणि नाष्ट्याची सोय करण्यात आली होती.सदर मोहिमेला नितीन कानगुटकर यांनी भेट देत सहयोग फाऊंडेशनच्या पदाधिकारी,सदस्य यांना पालशेत गाव परिसर स्वच्छ राहण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.